# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक २४.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३३३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,२६,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२३/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण २१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ४४०.८१ लिटर दारू असा एकुण १,५७,९८०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २३/११/२०२२ रोजी फिर्यादी गजानन बोराटे सपोनि हटटा यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८ भादवी २६(२)(पअ),२७(२)(म),३०(२)(अ),५९ अन्न सुरक्षा व मानके अधी.अन्वये गुन्हा नोंद असुन यातील आरोपीतांनी महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटखा स्वत:चे फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या खरेदी विक्री करीत असतंना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल असुन पुढील तपास हटटा पोलीस करत आहेत.

**किरकोळ दुखापत** :—दिनांक २३/११/२०२२ रोजी पोस्टे बासंबा, पोस्टे संनगाव व पोस्टे वसमत शहर येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०३ ठिकाणी कलम ३२६,३२४,३२३,५०४,५०६ भादंवि प्रमाणे गुन्हे नोंद असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.

**चोरी** :—दिनांक २३/११/२०२२ रोजी पोस्टे कुरूंदा, वसमत ग्रा. व कळमनुरी येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०३ गुन्हे कलम ३७९ भादंवि अन्वये दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.